**"महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना-२०२६" राज्यात लागू करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन आदेश क्रमांक: टिआरए-०४२६/प्र. क्र.१८९/पोल-८**

दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- २७ नोव्हेंबर, २०२६.

**वाचाः**-१) महाराष्ट्र शासनाचे गृह विभागाची अधिसूचना क्रमांक एमव्हीआर-०९१९/प्र.क्र.२००/परि-२, दिनांक २६ नोव्हेंबर २०२१.

२) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन (सिव्हील) क्र. २९५/२०१२ (एस. राजसिकरण विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर ) या याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दिनांक २८/०९/२०२६ रोजी पारित केलेले आदेश.

**प्रस्तावना :**

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ अन्वये प्रत्येक नागरिकाला सुरक्षितपणे जीवन जगण्याचा व त्याच्या जिविताचे संरक्षण होण्याचा मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आला आहे. त्या, अनुषंगाने सुरक्षित रस्ते उपलब्ध करुन देणे व रस्ते अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे हे राज्य शासनाचे घटनात्मक कर्तव्य आहे. तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशन (सिव्हील) क्र. २९५/२०१२ (एस. राजसिकरण विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या याचिकेमध्ये मा. न्यायालयाने दिनांक २८/०९/२०२६ रोजी पारित केलेल्या अंतरिम आदेशामध्ये केवळ मोठ्या प्रमाणावर ई चलने जारी करणे पुरेसे नसून, त्याद्वारे आकारण्यात आलेल्या दंडाची प्रत्यक्ष वसुली करणे आवश्यक असल्याचे मत स्पष्टपणे नोंदविलेले आहे.

०२. मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम २०० च्या पोटकलम (१) अन्वये गृह विभागाची दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ ची अधिसूचना क्रमांक एमव्हीआर-०९१९/ प्र.क्र.२००/परि-२ या अधिसूचनेमधील अनुसूचीमधील स्तंभ क्रमांक २,३,४,५ व ६ येथे मोटार वाहन अधिनियमातील तडजोड करावयाचे कलम, वाहनांचा प्रकार, तडजोड करण्यासाठी विनिर्दिष्ट केलेले अधिकारी, शुल्क भरण्यास दायी असलेला अपराधी, व अपराध आपसात

मिटविण्यासाठीची रक्कम या बाबी विनिर्दिष्ट केलेल्या आहेत. तसेच सदरची अधिसूचना ही सद्यस्थितीत अंमलात व लागू आहे.

०३. महाराष्ट्र राज्याच्या दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये **महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना- २०२६** ही राज्यात तीन टप्प्यात राबविण्यासाठी मान्यता दिली आहे.

०४. सबब, सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ मध्ये नमूद दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या अधिसुचनेच्या परिच्छेद क्रमांक ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रलंबित तडजोडपात्र ई चलानांच्या शुल्काच्या रकमेवर २० टक्के सूट देण्याच्या अनुषंगाने शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन आदेश:**

प्रस्तावनेमध्ये नमूद विवेचनास अनुलक्षून "महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना - २०२६" संपूर्ण राज्यामध्ये तीन टप्प्यामध्ये लागू करण्याकरीता खालील प्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहेत:

०२. महाराष्ट्र शासन मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम २०० च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संदर्भात समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, संदर्भ क्र. १ मध्ये नमूद महाराष्ट्र शासनाच्या गृह (परिवहन) विभागाच्या अधिसूचना क्रमांक एमव्हीआर-०९१९/प्र.क्र.२००/परि-२, दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या अधिसूचनेतील अनुसूचीच्या स्तंभ क्रमांक ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांच्या तडजोड शुल्काच्या रकमेमध्ये २० टक्के सूट देण्याबाबतचे प्राधिकार याव्दारे विहित कालावधीसाठी **"महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना-२०२६"** या योजनेअंतर्गत उक्त अधिसूचनेतील अनुसूचीच्या स्तंभ क्रमांक (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पोलीस अधिकारी यांनी उक्त अनुसूचीच्या स्तंभ क्रमांक (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कलमांखालील अपराध तडजोडीने आपसात मिटविण्याकरीता प्राधिकृत करण्यात येत आहेत.

०३. **संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती:-**

(१) सदर योजनेस **"महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना-२०२६"** असे म्हणावे. उक्त अभय योजना दिनांक ०१ डिसेंबर २०२६ या दिनांकापासून मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू होईल.

(२) सदर योजना महाराष्ट्र राज्यातील वाहतुकीच्या नियमांच्या उल्लंघनाबाबतच्या अपराधांबाबत महाराष्ट्र पोलीस दलाच्या अंतर्गत वाहतूक शाखेत कार्यरत किंवा वाहतूक कामकाज सोपविलेल्या गणवेशातील पोलीस अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने किंवा पोलिसांच्या अधिकृत इलेक्ट्रॉनिक अंमलबजावणी प्रणालीमार्फत विधिपूर्वक बजावलेल्या चलानांना लागू होईल.

(३) परिवहन विभागाने किंवा त्याच्या अंमलबजावणी प्रणालीमार्फत जारी केलेली चलाने या अभय योजनेच्या लाभाच्या कक्षेबाहेर असतील. त्यांना सदर अभय योजनेचे लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

०४. **"महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना-२०२६" योजनेअंतर्गत सवलतीचे टप्पे:-**

(१) **टप्पा १-एकवेळची सवलत योजना (One Time Consession)** :- दिनांक २१ जानेवारी २०२६ ते दिनांक ३० नोव्हेंबर २०२६ या दोन्ही दिनांकांसहच्या कालावधीत बजावलेल्या आणि योजना सुरू झाल्याच्या दिवशी वसुलीसाठी प्रलंबित असलेल्या पात्र ई- चलानांच्या एकूण थकित तडजोड रकमेवर २० टक्के सवलत लागू राहील. सदर योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी संबंधित वाहन चालक/धारक यांनी वर नमूद कालावधीत बजावलेल्या चलानावरील दंडाची रक्कम सदर योजना लागू झाल्यापासून ३० दिवसांच्या आत शासनखाती जमा करणे क्रमप्राप्त राहील.

(२) **टप्पा २- लवकर भरणा सवलत (Early Bird Scheme):-** दिनांक १ डिसेंबर २०२६ रोजी किंवा त्यानंतर बजावलेल्या किंवा बजाविण्यात येणाऱ्या आणि वसुलीसाठी प्रलंबित असलेल्या पात्र ई- चलानांच्या एकूण थकित तडजोड रकमेवर २० टक्के सवलत लागू

राहील. सदर योजनेअंतर्गत लाभ मिळण्यासाठी संबंधित वाहन चालक/धारक यांनी वर नमूद कालावधीत बजावलेल्या चलानावरील दंडाची रक्कम सदर चलान विधिपूर्वक बजावल्याच्या दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत शासनखाती जमा करणे क्रमप्राप्त राहील. सदर Early Bird Scheme सवलतीचा लाभ दिनांक ०१ डिसेंबर २०२६ पासून पुढे एक वर्ष म्हणजेच दिनांक ३० नोव्हेंबर २०२७ पर्यंत उपलब्ध राहील.

(३) **टप्पा ३ - न्यायालयात प्रलंबित चलानांवरील सवलत**:- दिनांक ३० जानेवारी २०१९ ते दिनांक २० जानेवारी २०२६ या दोन्ही दिनांकांसहच्या कालावधीत बजावलेल्या आणि योजना सुरू झाल्याच्या दिवशी सक्षम न्यायालयात किंवा आभासी न्यायालयात दाखल व प्रलंबित असलेल्या पात्र चलानांच्या एकूण थकित तडजोड रकमेवर २० टक्के सवलत देय राहील. सवलतीनंतर देय रक्कम अभय योजना सुरू झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत खालील नमूद केलेल्या पद्धतीने भरावी.

(४) **सदर योजना सुरु होणाऱ्या दिनांकापूर्वी शासनखाती भरणा केलेल्या कोणत्याही चलनांच्या रकमेचा/दंडाचा परतावा अनुज्ञेय राहणार नाही तथा मिळणार नाही**.

(५) याशिवाय, रद्द झालेले किंवा निकाली निघालेले चलान सदर अभय योजनेखालील लाभासाठी पात्र ठरणार नाही. तसेच न्यायालयीन स्थगिती आदेश असलेल्या प्रकरणात त्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

०५. **पात्र चलान व तडजोड करण्यास सक्षम अधिकारी:-**

(१) सदर योजनेत पात्र चलान म्हणजे वर नमूद केलेल्या कालावधीत बजावलेले असे चलान की, ज्यामधील अपराधाची तडजोड मोटार वाहन अधिनियमाच्या कलम २०० अन्वये कायदेशीररित्या करता येते आणि ज्यासाठी त्या प्रकरणास लागू असलेल्या संदर्भ क्र. १ मधील अधिसूचनेत तडजोड रक्कम व सक्षम पोलीस अधिकारी विनिर्दिष्ट आहेत असे चलान.

(२) संदर्भ क्र. १ मध्ये नमूद दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ च्या अधिसूचनेच्या अनुसूचीतील स्तंभ (२) मध्ये नमुद मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलमे हीच अपराध आपसात मिटविण्यासाठी सदर अभय योजनेअंतर्गत तडजोडीसाठी पात्र राहतील.

(३) संदर्भ क्र. १ मध्ये नमूद दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ च्या अधिसूचनेच्या अनुसूचीतील स्तंभ (४) मध्ये किंवा त्या प्रकरणास लागू असलेल्या अन्य अधिसूचित अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेले पोलीस अधिकारीच, त्यास दिलेल्या अधिकारांच्या मर्यादेत, या योजनेखाली तडजोड करील. याशिवाय, मुंबई पोलीस आयुक्तालयासह उर्वरित महाराष्ट्रातील पोलीस घटकांमधील पोलीस शिपाई यांना देखील सदर अभययोजनेखाली तडजोड योग्य अपराध मिटवता येतील.

०६. **देय तडजोड रक्कम:-**

(१) प्रत्येक पात्र अपराधासाठी त्या प्रकरणास लागू असलेल्या राज्य शासनाच्या संदर्भ क्र. १ मध्ये नमूद अधिसूचनेनुसार कायदेशीररीत्या देय व अद्याप न भरलेल्या तडजोड रकमेच्या ८० टक्के इतकी रक्कम या योजनेखाली देय असेल.

(२) एका चलानामध्ये एक किंवा एकापेक्षा अधिक अपराध नोंदविण्यात आलेले असल्यास आणि त्यापैकी एक किंवा एकापेक्षा अधिक अपराध विना तडजोडपात्र **(Non Compoundable)** असल्यास असे संपूर्ण चलन या योजनेंतर्गत तडजोडीसाठी अपात्र राहतील.

(३) परंतु, एका चलानामध्ये एक किंवा एकापेक्षा अधिक अपराध नोंदविण्यात आलेले असतील आणि त्यापैकी सर्व अपराध तडजोडपात्र **(Compoundable)** असतील, तरच संबंधित व्यक्तीच्या स्वेच्छेच्या संमतीने अशा सर्व अपराधांची एकत्रितपणे तडजोडीसाठी पात्र राहतील.

(४) संदर्भ क्र. १ मध्ये नमूद दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ च्या अधिसूचनेच्या अनुसूचीतील स्तंभ (६) मधील रक्कमेत २० टक्के सूट देण्यात येत असून, ती संबंधित प्रकरणास कायदेशीररित्या लागू असेल तेथे, या योजनेपुरती आणि तिच्या अटींनुसार वरीलप्रमाणे

फेरविनिर्दिष्ट करण्यात येत आहे. इतर प्रकरणांत त्या प्रकरणास लागू असलेला विधिपूर्वक विनिर्दिष्ट दर सवलतीच्या गणनेसाठी वापरावा.

०७. **न्यायालयात प्रलंबित प्रकरणांची कार्यपद्धतीः-**

कोणत्याही टप्प्यातील न्यायालयात प्रलंबित प्रकरणात, संबंधित आरोपीच्या स्वेच्छेच्या संमतीने, सक्षम पोलीस अधिकारी कलम २०० अन्वये मा. न्यायालयाच्या आदेषान्वये तडजोड करील. चलान व न्यायालयीन प्रकरण क्रमांक यांची पडताळणी करून न्यायालयाने अनुमत केलेल्या पद्धतीने रक्कम स्वीकारावी आणि भरण्याचा पुरावा व तडजोडीचा अहवाल न्यायालयास सादर करावा. न्यायालयीन प्रकरणाचा निपटारा संबंधित न्यायालयाच्या आदेशानुसार नोंदवावा. त्याच चलानासाठी आगाऊ जमा किंवा भरलेल्या रकमांचा कायद्यानुसार किंवा न्यायालयाच्या आदेशानुसार हिशेब घ्यावा.

०८. **भरणा आणि तडजोडीचा परिणामः-**

(१) न्यायालयात प्रलंबित प्रकरणांसाठी वर नमूद परिच्छेद ०७ लागू राहील. अन्य पात्र चलानांची रक्कम वाहतूक पोलिसांच्या अधिकृत चलान पोर्टलवर ऑनलाईन किंवा जवळच्या वाहतूक पोलीस विभागात रोखीने भरावी. तडजोडीची नोंद संबंधित चलानासमोर करून शुल्क भरण्याची पावती संबंधितास द्यावी. योजनेच्या प्रारंभापूर्वी केलेल्या भरण्यावर या आदेशाखाली परतावा देय होणार नाही.

(२) टप्पा २ मधील ४५ दिवसांची भरणा अट सवलतीच्या पात्रतेसाठी आहे. केंद्रिय मोटार वाहन नियम, १९८९ यांच्या नियम १६७ च्या उपनियम (५) मधील चलान जारी झाल्याच्या दिनांकापासून गणली जाणारी भरणा किंवा हरकतीची वैधानिक मुदत आणि नियम १६७ व १६७-अ मधील इतर प्रक्रिया व मुदती लागू राहतील.

(३) विधीपूर्वक तडजोड झाल्यावर मोटार वाहन अधिनियमाच्या कलम २०० च्या पोट-कलम (२) मधील परिणाम व दोन्ही परंतुक लागू होतील. त्यानुसार पूर्वीच्या अपराधाची गणना, कलम २०६(४) अन्वये कार्यवाही, चालक पुनः प्रशिक्षण आणि सामुदायिक सेवा यासंबंधी लागू तरतुदी अबाधित राहतील.

०९. महाराष्ट्र वाहतूक पोलीस चलान अभय योजना - २०२६ या योजनेचा कालावधी हा टप्पेनिहाय संपुष्टात आल्यानंतर, तडजोडपात्र चलान शुल्काची रक्कम ही प्रचलित अधिसूचना, कायदे व नियमांनुसार आकारण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. तसेच, मोटार वाहन अधिनियम, त्याखालील नियम आणि लागू न्यायालयीन आदेश यांच्या अंमलबजावणीसाठी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी.

१०. अभय योजनेचा कालावधी संपल्यानंतर वाहतूक नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या एस. राजसिकरण विरुध्द केंद्र शासन या याचिकेतील निर्देशानुसार तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियमांनुसार परवाना निलंबन, वाहनाचे व्यवहार प्रतिबंधित करणे, वाहन जप्ती इत्यादी प्रकारची नियमोचित कारवाई करण्यात यावी.

११. सदर अभय योजनेची व्यापक प्रमाणात शासनामार्फत जनजागृती करण्यास आणि त्यावर येणारा खर्च हा रस्ता सुरक्षा निधी मधून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२. सदर शासन आदेश मंत्रिमंडळाच्या दिनांक ०४ नोंव्हेंबर २०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार व मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

१३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६११२७१३२३३१२३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRITAMKUMAR VASANTRAO JAWALE

Digitally signed by PRITAMKUMAR VASANTRAO JAWALE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:GOVERNMENT OF MAHARASHTRA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=87CC7562AE4425665BEBFCB265AA4A6AE1CEA07B580617493A4425E224DEE8D9, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3377888391CF722143D26EEEA9BEFCDAD091509EF5236580A7D753D8635115, cn=PRITAMKUMAR VASANTRAO JAWALE
Date: 2026.11.27 13:24:41 +05'30'

**(प्रितमकुमार जावळे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. सभापती/उप सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य.
२) मा. अध्यक्ष्य/उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य.
३) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

६) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

८) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव मंत्रालयीन विभाग.

९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

१०) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई,

११) सह पोलीस आयुक्त (वाहतूक), वरळी, मुंबई.

१२) सर्व पोलीस आयुक्त/अधीक्षक.

१३) महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

१४) महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखा परिक्षा), मुंबई.

१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

१६) निवासी लेखाधिकारी, मुंबई.

१७) उप सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८) निवडनस्ती (पोल-८),